प्रकरण पहिले

# रा. ना. पवारांचे जीवनचरित्र आणि व्यक्तित्व

प्रकरण पहिले

# रा. ना. पवारांचे जीवनचरित्र आणि व्यक्तित्वाची जडणघडण

मराठी साहित्याला काव्याची फार मोठी परंपरा आहे. संतकवींची भक्ति मार्गी कविता, पंडिति कवींची कथात्मक व आख्यायक कविता आणि शाहिरी कवींची लावणी व पोवाडे यांची कविता, यांनी प्राचीन मराठी साहित्य समृद्ध केले. त्यानंतर आंग्लकाळात इंग्रजी काव्याच्या प्रभावाने मराठीत 'आधुनिक काव्य' निर्माण झाले. केशवसुतांच्या संप्रदायातील केशवसुत, रेव्हरंड टिळक, बालकवी, विनायक, गोविंदाग्रज यांनी आणि त्याचवेळी चंद्रशेखर, बी, भा. रा. तांबे यांनी स्वच्छंदवादी (सौंदर्यवादी) काव्य समृद्ध केले. त्यानंतरचा म्हणजे १९२० नंतर रविकिरणमंडळातील माधव ज्युलियन, गिरीश, यशवंत आणि त्यांच्या सहकारी मित्रांनी त्यात मोलाची भर घातली. सन १९४० नंतर मर्ढेकरांनी सुरु केलेल्या नवकवींच्या संप्रदायातील कवी, सन १९६० नंतर दलित कवी आणि ग्रामीण कवींनी मराठी कवितेत नवा प्रवाह आणून मराठी काव्य समृद्ध केले.

आधुनिक मराठी कवितेचा सन १८८५ ते १९६० पर्यंत प्रवाह पाहिला तर या कालखंडातील बहुतेक कवी पुणे, मुंबई, नाशिक या भागातील होते, असे दिसून येईल. याच भागात साहित्य लेखनाला प्रेरणा देणारी साहित्य मंडळे होती, प्रकाशन संस्था होत्या आणि मराठीतील अनेक नामवंत कवींचा त्यांच्याशी संपर्क असल्याने त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. तसेच याच परिसरात प्रमुख वृत्तपत्रे व मासिके निघत असल्याने या कवींविषयी माहिती आणि त्यांच्या काव्याविषयी समीक्षा प्रसिद्ध झाली. मराठी कवितेचा इतिहास लिहिणाऱ्यांनी त्या आधारेच साहित्याचा (काव्याचा) इतिहास लिहिला, त्यामुळे ठराविक कवींची आणि त्यांच्या कवितेची नोंद झाली. हे स्वाभाविक होते. परंतु मराठी काव्यक्षेत्रातील विविध परंपरा चालविणारे अनेक कवी महाराष्ट्राच्या विविध भागात, विविध जिल्ह्यात होते. त्यांच्या काव्याची गुणवत्ता त्या त्या कालखंडातील प्रस्थापित कवींच्या मानाने कमी नव्हती. पुणे, मुंबई, नाशिक या परिसराबाहेर अनेक चांगल्या प्रकारचे कवी निर्माण झाले. त्यांनी उत्कृष्ट प्रकारची कविताही लिहिली. ते सातत्याने काव्यलेखन करीत राहिले; परंतु त्यांची साहित्य इतिहासकारांनी घ्यावी तशी नोंद घेतलेली नाही. त्यामुळे अनेक कवी उपेक्षित राहिले. वास्तविक पाहता या कवींनी आपल्या प्रवृत्तीनुसार मराठी कवितेतील वेगवेगळ्या परंपरा समृद्ध करण्यास हातभार लावलेला होता. त्यांची दखल कोण घेणार? सोलापुरातील कुंजविहारीसारखा राष्ट्रीय भावनेचा ज्वलंत आविष्कार करणारा कवी उपेक्षित राहिला. कवी संजीवासारखा लावण्या आणि गझल लिहिणारा कवी उपेक्षित राहिला. सांगलीकडील कवी सुधांशु, कोल्हापुरातील सूर्यकांत खांडेकर, जगदीश खेबुडकर असे अनेक कवी उपेक्षित राहिले. कविवर्य ग. दि. माडगुळांसारखा माणदेशी

कवी पुण्याला गेल्यानंतरच प्रकाशात येतो याचा अर्थ काय? महाराष्ट्राच्या विविध भागाच्या कवींनी मराठी कवितेला नवीन वळण लावलेले नसले तरी असलेल्याच परंपरा त्यांनी समृद्ध केल्या. म्हणून त्यांची दखल घेणे आवश्यक नाही काय? अलिकडील उदाहरण द्यायचे झाले तर पुण्या-मुंबईच्या परिसरातील एखाद्या चांगल्या कवीचे एक-दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले की त्यांची पुण्या-मुंबई परिसरातून असलेल्या वृत्तपत्रातून, साप्ताहिकांतून समीक्षा येते; परंतु त्या परिसराबाहेर असलेल्या एखाद्या चांगल्या कवीचे दहा-पंधरा काव्यसंग्रह प्रकाशित होऊनही त्यांची दखल घेतली जात नाही ही वस्तुस्थिती नाकारता येईल का? कवी संजीव, कवी सुधांशु, कवी सुर्यकांत खांडेकर यांची दखल किती समीक्षकांनी घेतली? अशा अनेक कवीनी सातत्याने काव्यलेखन करुन मराठी काव्याच्या समृद्धीला हातभार लावला असताना त्यांची दखल घेणे योग्य ठरणार नाही का? या दृष्टीने अभ्यासकाने त्यांच्या काव्याची दखल घेणे योग्य ठरते. म्हणून सोलापुरातील एक प्रतिभासंपन्न कवी रा. ना. पवार यांच्या काव्याची समीक्षा करण्याचा प्रयत्न या शोधप्रबंधिकेच्या द्वारे केला आहे.

**सोलापूरची कवी परंपरा :-**

सोलापुरातील एक फार मोठी कवी परंपरा आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम आणि एकनाथ या श्रेष्ठ संताना काव्याची प्रेरणा देणारे आराध्य दैवत 'पंढरपूरचा विठोबा' हा सोलापुरच्याच परिसरातील आहे. त्याही पेक्षा महत्वाचे म्हणजे संताच्या प्रभावळीतील जनाबाई, परिसा भागवत, सावंता माळी, विसोबा खेचर, चोखा मेळा, सोयराबाई, कर्ममेळा, नरहरी सोनार, जोगा परमानंद (बार्शी), सेना न्हावी, कान्होपात्रा या सामान्य स्तरातून आलेल्या स्त्री-पुरुष संतानी भक्तिकविता कितीतरी समृद्ध केली आहे. पंडिती कवींमधील लोकप्रिय 'हरिविजय' आणि 'पांडवप्रताप' लिहिणारा श्रीधर हा याच परिसरातला. नागेश परंपरेतील अनेक कवी आणि त्यांचे दैवत याच परिसरातील. शाहिरी परंपरेतील श्रेष्ठ शाहिर कविराय रामजोशी हे तरी खुद्द सोलापूरचेच आहेत. त्यांनी तरी मोठ्या अभिमानाने म्हटले आहे, -

''पाय धरिल कविराय दुजा अशि काय लावणी करी ।
माय कुणाची व्याली या गगनाखाली कविता सोलापूरी ।।''

रामजोशींच्या काळात कवी शुभराय या प्रतिभासंपन्न कवीने मराठी कन्नड, तेलगु भाषेत समर्थ रचना केली आहे.

हा इतिहास पाहता सोलापूरच्या मराठी काव्य परंपरेला संतकाव्याची, पंडितीकाव्याची परंपरा आहे. त्यांचाच परिणाम म्हणजे आधुनिक काळात जे सोलापुरात कवी झाले त्यांच्यावर संताच्या

भक्तिमार्गी कविता आणि शाहिरांच्या शृंगारात्मक लावणीचा वीररसात्मक पोवाड्यांचा मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला दिसून येतो.

आधुनिक काळात सोलापूरच्या कवी कुंजविहारींनी आपल्या राष्ट्रीय कवितेने स्वातंत्र्यचळवळीला आणि मराठी राष्ट्रीय कवितेला फार मोठे योगदान केले आहे. पारतंत्र्याच्या काळात 'भेटेन नऊ महिन्यानी,' 'मुळशीचा पाळणा' या क्रांतीकारक कविता लिहून फार मोठी जागृती केली. त्यानंतर वासुदेवशास्त्री बागेवाडीकर, रामचंद्र टिकेकर, श्री पाटणकर, य.गो. जोशी तसेच स्त्रियांमध्ये सौ. चंपाबाई मोहोळकर, लक्ष्मीबाई यांच्याही रचना आढळतात.[१]

अगदी अलिकडील काळात गाजलेले कवी संजीव होत. त्यांनी अनेक चित्रपटगीते लिहिली. 'सासर माहेर'(१९५६), 'भाऊबीज'(१९५७), 'पाटलाची सून'(१९६७) या गाजलेल्या चित्रपटांतील भावपूर्ण गीते व कथा त्यांच्याच होत्या. इतकेच नव्हे तर १५-२० चित्रपटांची गीते त्यांनी लिहिलेली आहेत, याशिवाय त्यांचे १५ कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. कवी संजीवांच्या बरोबरच रा.ना. पवारांनी ही विविध काव्यप्रकारात हजारो कविता लिहिल्या, एवढेच नव्हे तर महाराष्ट्राच्या अनेक दैनिकातून, मासिकातून, दिवाळी अंकातून कवी संजीव आणि रा.ना. पवारांच्या कविता प्रसिद्ध होत असत. द.ब. मुद्गलशास्त्री यांच्याही कविता प्रकाशित आहेत. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व विचारवंत डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे वडिल पंडित जिनदासशास्त्री फडकुले यांची अनेक स्फुटकाव्ये व पद्मपुराण हे महाकाव्य प्रसिद्ध झाले आहे. सोलापूरचा अभिमान बाळगणारा असा आणखी एक श्रेष्ठ कवी म्हणजे अमरशेख. दलितांच्या, शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या जीवनावर त्यांनी लिहिलेल्या लावण्या सुप्रसिद्ध आहेत. याशिवाय प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख, श्री. ल.ग. जोशी, श्री. मा. गो. काटकर, श्री. पं. ना. कुलकर्णी, कुमार कोठावळे, दत्ता हलसगीकर, लक्ष्मीनारायण बोल्ली, कवी राजीव, नारायण सुमंत, श्री. माधव पवार, मुबारक शेख, प्रकाश जडे, चंद्रकांत झुंजे, प्रा. चंद्रभुषण कुलश्रेष्ठ, प्रा. निशिकांत ठक्कार, श्रीमती शशीकला साळगावकर, अरुणकुमार इंगळे, प्रा. संजय लांडगे, गोविंद काळे या कविनींही उत्कृष्ट प्रकारच्या कविता लिहिल्याआहेत. डॉ. राजशेखर हिरमेठ यांनी गझल, शेरशायरी, हायकु आणि कन्नड वचन धरतीवरची कविता लिहून मराठीत प्रयोगशीलता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

जुन्या व नव्या कवींच्या काव्यांचा संस्कार घेवुन सोलापुरातील रा.ना.पवार यांनी आपली मराठी कविता लिहिली. संतकवीच्या भक्तिकविता शाहिरांच्या लावण्या व पोवाडे यांचा आणि आधुनिक मराठी कवितेतील स्वच्छंदवादी कवींचा संस्कार घेवुन श्री. रा.ना. पवार यांनी सातत्याने ५० वर्षे काव्यलेखन केले. त्यातील अनेक कविता महाराष्ट्रातील प्रमुख प्रथितयश वृत्तपत्रांतून व मासिकांतून

प्रसिद्ध झालेल्या आहेत; परंतु दुर्दैवाने त्यांच्या हयातीत काव्यसंग्रह प्रकाशित होऊ शकला नाही. डॉ. निर्मलकुमार फडकुले, प्रा. श्रीराम पुजारी, या त्यांच्या मित्रांनी आणि रा.ना. पवारांवरती प्रेम करणाऱ्या काव्यरसिक मित्रांनी त्यांच्या मृत्युनंतर 'सावळ्या विठ्ठला' हा त्यांच्या निवडक कवितांचा संग्रह दि. ५ नोव्हेंबर १९९३ रोजी प्रकाशित केला. या संग्रहामध्ये रा. ना. पवारांच्या प्रमुख कवितांचा समावेश असल्याने या संग्रहातील कवितांच्या आधारे तसेंच सन. १९६२ ला चीन-भारत युद्धाच्या वेळी प्रकाशित झालेला 'संग्रामगीते' या संग्रहाच्या आधारे या कवीचा आणि त्यांच्या काव्यप्रवृत्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न या शोधप्रबंधिकेत केला आहे.

कवी रामचंद्र नारायण पवार यांचा जन्म २९ जुलै १९२१ रोजी सोलापुरात झाला. त्यांच्या आईचे नाव तुळसाबाई व वडिलांचे नाव नारायण होते. वडिल पोष्ट ऑफिसात कारकुन होते. त्यांना दोन मुले आणि पाच मुली.अंजना, मथुरा, प्रल्हाद, सोना, रामचंद्र, इंदू, गोदा असा त्यांचा परिवार होता.

**बालपण :-**

रामचंद्र हा लहानपणापासूनच हुशार, खोडकर पण खेळकर स्वभावाचा होता. तो लहानपणीच घरातील भावंडा-बहिणींची, शेजारी माणसांच्या बोलण्या-चालण्याची नक्कल करुन दाखवित असे. घरची परिस्थिती कमालीची नाजूक होती. अठराविश्व दारिद्र्य पाचवीला पुजलेले होते. रामचंद्र हेच घरात हसविणारे मुल आणि फुलणारे फुल होते. दारिद्र्यात झिंगलेल्या, मरगळलेल्या पिचलेल्या मनात कधी कधी हास्याची कारंजी पेरीत होते.

रामचंद्र हा लहानपणापासूनच हुशार होता त्याला घराजवळील मोदीखान्यातील नगरपालिकेच्या मराठी शाळेत सन १९२७ साली म्हणजे वयाच्या ६व्या वर्षी नाव दाखल केले. सन १९३० पर्यन्त म्हणजे इयत्ता तिसरी पर्यंत त्याच शाळेत शिकले. नंतर; त्याचवर्षी अक्कलकोटला पुढील शिक्षणासाठी गेले.[२]

रामचंद्राची ज्येष्ठ बहिण अंजना हिचा विवाह अक्कलकोटमधील प्राथमिक शाळेचे शिक्षक श्री. श्रीपत तुकाराम इंगळे यांच्याशी करुन दिला होता. इंगळे मास्तरांची कवी, नाटककार व उत्तम गायक म्हणून ख्याती होती. कधी कधी अक्कलकोटचे विजयसिंगराजे युवराज यांच्या दरबारात गायनाचा व नाटकाचा कार्यक्रमही सादर करीत असत.[३]

कलाकारांची ओळख कलाकारांनाच होते. तसे एका कलाकाराने दुसऱ्या कलाकाराचे सुप्त गुण ओळखुन त्यांच्या सुप्तगुणांना वाव देणारा कलाकार आजच्या जगात तरी विरळाच! इंगळे मास्तरांनी रामचंद्राचे कलागुण पारखून सोलापूरहून अक्कलकोटला सन १९३० साली नेले व तेथील

शाळेत परत पहिल्या इयत्तेत नाव दाखल केले.

इंगळे मास्तर स्वत: नाटकही लिहित होते. त्यांनी नाटक लिहून तेथील वस्तीगृहातील मुलांकडून तालीम घ्यायचे व राजेसाहेबांच्या दरबारात व त्यांच्या वाढदिवशीही सादर करायचे व त्यात कधी कधी छोट्या मोठ्या भूमिकाही रामचंद्राला मिळत होत्या. प्रथम त्यांनी सन १९३१ साली 'खरा शिवाजी कोण?' या इंगळे मास्तर लिखित नाटकात बर्हिजीची भूमिका वठविली.[४] हा कलाक्षेत्रातील उमलत्या फुलाचा पहिला अंकुर होता.

**काव्यलेखनाची प्रेरणा :-**

रा. ना. पवारांना इंगळे मास्तरांच्या सहवासाने साहित्याचा वेध लागला. रा. ना. पवारांना लहानपणापासूनच इतरांची नक्कल करण्याची खोड, त्यातून नाटकात भूमिका करणे व नाटक लिहिण्याचे वेड लागणे साहजिकच होते. सन १९३१ च्या दरम्यान रा. ना. पवारांनी 'अफजलखानाचा वध' हे नाटक लिहून जीवनातील साहित्य लेखनीचा 'श्रीगणेशा' केला.[५] नाटकाचे स्वरुप दोन अंकी दहा पानी असे होते. हे नाटक लिहून तेथील मित्रांच्या मदतीने बसविले आणि दोन पेन्सिली तिकिट दर ठेवला. त्या नाटकावरती त्यांनी पहिली कविताही लिहिली-

''प्रथमदर्शनी खानाचा वध।
नाटक केले बालांनी॥
दोन पेन्सिली तिकिट ठेविले।
आश्रय द्यावा सकलांनी॥''[६]

**वाङ्मयीन संस्कार :-**

सन १९३० ते १९३७ हा काळ रा. ना. पवारांच्या जडणघडणीचा. माणूस ज्या वातावरणात वाढतो, त्याला जशी संगत मिळते, तशी त्यांच्या जीवनाची रेखा लचकत, मुरडत, रेखाटत जाते.

इंगळे मास्तरांच्या घरी रा. ना. पवारांना 'व्युत्पत्तिप्रदीप' हे पुस्तक आढळले. या पुस्तकात शब्दांची निर्मिती कशी होते याची सुरेख माहिती त्यात दिली आहे. त्यांनी हे पुस्तक पुन्हा पुन्हा वाचून आत्मसात केले. त्यानंतर वा.गो. आपटे यांचे 'शब्दरत्नाकर' हे पुस्तक वाचनालयात आढळले.[७] हे पुस्तक त्यांना इतके आवडले की, ते पुस्तक त्यांना चोरुन ठेवण्याचा मोह झाला होता. पण सरस्वतीची आराधना करताना कधी कधी लक्ष्मी आडवी येते. दारिद्र्यात राहुनही पैशाने श्रीमंत होण्याचा मोह त्यांना कधी स्पर्श केला नाही पण शब्दांचा खजिना लुटण्याची, पुस्तकांच्या भांडारात तासन्तास

रमण्याची हौस फार मोठी होती.

**स्वाभिमानी स्वभाव :**

कवी रा. ना. पवारांच्या घरची परिस्थिती कमालीची नाजूक होती. मेव्हुण्यानी व इतरांनी आपल्यासाठी खर्च करावा हे त्यांच्या स्वाभिमानी मनाला पटत नसे. स्वाभिमान हा सर्व सद्गुणांचा पाया आहे, असे म्हटले जाते. बुद्धिवंताचा स्वाभिमान त्यांना करारी बनवितो. मनाला कधी बाक येऊ देत नाही. पोटातला अग्नीचा गोळा थंड करण्यासाठी कधी कधी प्रामाणिक माणसे देखील बेईमानदारीशी नाते जोडतात. अंगात हत्तीचे बळ असलेली माणसे देखील कंटाळून कशाही मार्गाने पोटातली पोटतिडकी बंद करतात पण रा. ना. पवारांसारख्या कलंदरवृत्तीच्या माणसाला हे पटत नाही. म्हणून साधे, सोपे व सरळ जीवन आपला उदरनिर्वाह व शिक्षणाचा खर्च हे अंगात असलेली कला व गोडगळा यांची सांगड घालून जीवनाची ज्योत जिवंत व ज्वलंतपणे तेवत ठेवली. हेच त्यांच्या जीवनातील मर्म आहे. त्यांचा असा स्वाभिमानी स्वभाव शेवटपर्यंत टिकून राहिला.

सन १९३७-३८ साली कवी रा.ना. पवार सोलापुरला आल्यानंतर चाटीगल्लीत श्रीनिवास कृष्ण देशपांडे यांनी चालविलेल्या अनाथ विश्रामगृहात एका वर्षात इंग्रजी तीन इयत्ता शिकले व सन १९३८-३९ ला हरिभाई देवकरण प्रशाला सोलापूर या शाळेत इंग्रजी चौथीत म्हणजे मराठी आठवीत प्रवेश घेतला. त्या काळात कविता करण्याचा छंदही त्यांना जडला होता. याचवर्षी त्यांची पहिली कविता हरिभाई देवकरण प्रशालेच्या नियतकालिकेत प्रसिद्ध झाली. त्यावेळी नियतकालिकेचे संपादक बा. ना. ताटकेसर होते. नियतकालिकेसाठी दिलेल्या त्यांच्या कवितेत त्यांनी 'कांत' हा शब्द 'मुलगा' ह्या अर्थी वापरला होता. ताटकेसरांनी त्यांना बोलावून त्यांची चुक लक्षात आणुन दिली, व रा.ना. पवारांना ग्रंथालयात घेवुन जावुन 'महाराष्ट्र शब्द कोशाचे' सात खंड दाखविले. त्यांना वेळ मिळेल तेव्हा ग्रंथालयात जावुन एक-एक खंड वाचून काढले पण एकदा वाचून त्यांचे समाधान झाले नाही. त्यासाठी त्यांनी शब्दकोश विकत घेण्याचा संकल्प केला.[८]

**नकलाकार :**

रा. ना. पवार अक्कलकोटला असल्यापासून नकलांचा कार्यक्रम करीत होते. सोलापुरला आल्यापासून त्यांच्या कार्यक्रमाला वेगळाच रंग चढला होता. कधी रुपया, कधी दोन रुपये मिळत होते. त्याचवेळी 'कामगार कल्याण केंद्रे' सोलापुरात निघाली होती. तेव्हापासून महिन्यातून एक, दोन वेळा तरी कामगार कल्याण केंद्रात हमखास कार्यक्रम होत होता व तेथे एका कार्यक्रमाला पाच रुपये मिळत होते. कमाई वाढली होती. प्रसिद्ध नट दिनानाथ टाकळकर हे त्यांच्या नकलांच्या

कार्यक्रमात साथीदार होते.[९]

रा. ना. पवार पोटाला चिमटा घेऊन पै-पै जमवित होते. महाराष्ट्र शब्दकोशाचे सात खंड विकत घेण्याचा ध्यासच त्यांनी घेतला होता. त्यांच्याकडे चाळीस रुपये जमा झाल्यानंतर ते पुण्याला 'प्रसाद' कार्यालयात दाखल झाले. 'प्रसाद' प्रकाशनाचे संस्थापक आणि प्रसिद्ध लघुकथा लेखक श्री. य. गो. जोशी कार्यालयात होते. नामवंत लेखकाला भेटण्याचा तो पहिलाच प्रसंग होता. रा. ना. पवारांनी सर्व हकीगत सांगितली. चाळीस रुपये जमा करुन आणले आहेत. तूर्त चार खंड द्या. बाकीचे तीन खंड नंतर पैसे जमा केल्यानंतर घेऊन जातो असे रा. ना. पवार म्हणाले.

श्री. य. गो. जोशींना हा प्रसंग नवखा होता. आतापर्यंत शाळा-कॉलेजसाठी अनेकजण शब्दकोश घेऊन गेलेले होते. पण एवढा लहान मुलगा 'महाराष्ट्र शब्दकोश' विकत घेण्यासाठी येतो तेही नकलांवर पैसे जमा करुन, हे विशेष होते. य. गो. जोशींनी रा. ना. पवारांची जिद्द पाहून चाळीस रुपयातच सात खंड दिले व तीस रुपये सूट दिली आणि पाठीवर थाप मारुन 'पुढील जीवनात यशस्वी हो!' असा आशीर्वाद दिला. रा. ना. पवारांनी उराशी दोन स्वप्ने बाळगली होती. पहिले 'महाराष्ट्र शब्दकोशाचे सात खंड विकत घेणे' व दुसरे 'शिक्षक होणे'. पहिले स्वप्न तरी य. गो. जोशीनी पूर्ण केले.[१०] दुसरे स्वप्न पूर्ण करण्यासाठी धडपड केली पण ते अपूर्णच राहिले.

**कौटुंबिक वातावरण/जीवन :**

कवी रा. ना. पवारांचे वडिल लहानपणीच वारल्यामुळे घर सांभाळण्याची जबाबदारी आई (तुळसाबाई) वर पडली. सोलापुरात त्यांच्या राहत्या घराजवळ अंबाबाईचे देऊळ आहे. त्या देवीची पूजा-अर्चा त्यांच्या घराण्याकडून परंपरागत चालत आलेली होती. आपल्या हिंदू धर्मात महिन्यातून एकदोन तरी सण असतात त्यावेळी नैवेद्य म्हणून आलेल्या अन्नावर एक दोन दिवस तरी गुजरण होत असे. इतरवेळी दिवसभर भटकून शेण गोळा करुन त्यांच्या गवऱ्या थापून, त्या विकून त्यावरती उदरनिर्वाह चालत होता. रा. ना. पवारही नकला करुन आपल्या शिक्षणाचा खर्च भागवून घरखर्चालाही हातभार लावीत असत. घरात खाणारी सहा पोटे, त्यांची पोटे भरणे तर सोडाच, कधी अर्धपोटी, कधी उपाशीपोटी तर कधी गंगाजलावर भागवून दिवस काढीत होते.

कवी रा.ना. पवारांचा मोठा भाऊ प्रल्हाद हा वडिलांच्या ठिकाणी पोष्टऑफिसात कारकून म्हणून कामाला लागला. त्यावेळी सर्वांना बरे वाटले. सर्वांच्या जीवात जीव आला, 'बुडत्याला काडीचा आधार' म्हणतात ना! त्याप्रमाणे, पण काही कुटुंबाशी दारिद्र्य इतके एकरूप झालेले असते की, त्यांच्यापासून वेगळे करणे शक्यच नसते. प्रल्हाद हा व्यसनी, बैदफैली व बाहेरख्याली होता त्यामुळे

दारिद्र्याची पातळी सह्याद्री पर्वतावरुन खाली येण्याऐवजी हिमालयासारखी वाढतच गेली. मोठ्या भावाचे कर्ज बऱ्याच वेळा रा.ना. पवारांनी फेडले पण काही उपयोग झाला नाही. एखाद्या वेळेस वारसा हक्काने मिळणारी इस्टेट मिळत नाही पण दारिद्र्य न मागताही मिळते.

रा. ना. पवारांचा 'मागे वळून पाहताना' (केसरी १ ऑक्टोबर १९९०) हा आत्मकथपर लेख वाचला की मन खिन्न होऊन जाते, 'माणसं जगण्यासाठी किती आटापिटा करतात आणि त्या जगण्यापेक्षा 'मरणे' बरे वाटत असले तरीही जगतात व विशेष म्हणजे ते ही प्रामाणिकपणे जगतात या गोष्टीवर आजचे जग पाहिले की विश्वासच बसत नाही. पण त्यांच्या बाबतीत हे एक करुण सत्य आहे.

कवी रा. ना. पवारांना नियतीने संकटामागून संकटाची माळच अर्पण केली होती. त्यांना जन्मापासून आर्थिक विवंचनेने लोळवत ठेवले, तरीही त्यांनी कधी हार मानली नाही. सतत हसत व हसवतच राहिले. कदाचित त्यांच्यापुढे दु:खाचा डोंगर जरी आला तरी त्यांच्या सहवासाने सुखाचा सागरच होत असावा. आपले नशीब कुणी लिहून ठेवलेले नसते, ते स्वत:लाच घडवावे लागते हे रा.ना. पवारांच्या बाबतीत खरे आहे असे म्हणता येईल. सरस्वती व लक्ष्मी एका घरात नांदत नसतात असे माहित होते पण लक्ष्मीनेही प्रामाणिकपणाशी फारकत घेतली आहे असे दिसून येते.

**नोकरी :**

कवी रा.ना. पवारांनी सन १९४२ ला मॅट्रीक (जुनी अकरावी) झाल्यानंतर सोलापुरातील दयानंद महाविद्यालयात कला शाखेत प्रवेश घेतला. लहानपणापासून 'कमवा आणि शिका' या कर्मवीर भाऊराव पाटलांच्या ब्रीदानुसार वागत होते. त्यांनी मिळेल ते काम केले पण कुठेच त्यांना स्थिरता लाभली नाही. शिक्षण घेत घेत काम करायचे व काम करीत करीत शिक्षण घ्यायचे. त्यांना चांगली नोकरी प्रथम सन १९४३ साली कोल्हापूरला भालजी पेंढारकराकडे 'अप्रेंटिस ॲक्टर' म्हणून लागली.[११] अंगात अभिनयाचे कौशल्य कसलेले होते पण नशीबाचा फेरा उलट फिरत असल्यामुळे त्यांच्या घरच्या काही अडचणींमुळे सोलापुरला एक वर्षातच परत यावे लागले. त्यानंतर सन १९४४ ला पुण्याला 'मिलिंटरी अकौटेंट' म्हणून मासिक ४५ रु. वर काम केले.[१२] त्यांना १ नोव्हेंबर १९४५ ला मध्य रेल्वेत सोलापूर रेल्वे स्थानकावर कारकुनाच्या नोकरीचे पत्र आल्यानंतर पुण्यातील नोकरी सोडून ते रेल्वेत लागले व तेथेच कायमचे सेवानिवृत्त होईपर्यंत राहिले.

रा. ना. पवार रेल्वेसारख्या शिस्तप्रिय खात्यात राहूनही नोकरीबरोबर त्यांच्या आवडत्या छंदाचीही आराधना करीत राहिले व ३१ जुलै १९७९ ला म्हणजे ३४ वर्ष मध्य रेल्वेत सेवा करुन निवृत्त

झाले.[१३]

रा. ना. पवार नोकरी करीत शिक्षण घेत होते. पण त्यांना बी.ए.चा शेवटचा वर्ष काही पूर्ण करता आला नाही. यावेळी घर सांभाळण्याची पूर्ण जबाबदारी त्यांच्यावरच होती. बहिणींची लग्न केलेले कर्ज अजून फेडायचे होते.ते कमी आहे की काय? असे समजून रा.ना. पवारांचा मोठा भाऊ प्रल्हाद त्यात आणखी भर घालीत होता. आणि रा.ना. पवार झालेल्या कर्जावर आपल्या तुटपुंज्या पगारीने कर्ज फेडण्याचा अट्टाहास करीत होते. त्यात आणखी भर म्हणून आईने सारखे 'लग्न करुन घे' असा तगादा लावला होता.

**विवाह :**

सोलापुरात रामजोशींच्या घराजवळ भानुदास घोरपडे राहत होते. रा.ना. पवारांचे ते जिवलग मित्र होते. तो श्रीमंत मुलगा होता. सहज एकदा दोघांत मुलीचा विषय निघाला आणि भानूदासाने आपलीच बहीण 'लीलावती' हिचा विवाह १३ जून १९४७ रोजी रा.ना. पवारांशी करुन दिला. पुढे काही दिवस गेल्यानंतर काही कारणानी दोघा जिवलग मित्रांची कायमची ताटातुट झाली पण पत्नीला एका शब्दानेही कधी दुखविले नाहीत.

कवी रा. ना. पवारांच्या संगीतातील आवडता राग आसावरी. लग्नानंतर रा. ना. पवारांनी आपली धर्मपत्नी लीलावतीचे 'आसावरी' असे नामकरण केले. श्रीमती आसावरी या धार्मीकवृत्तीच्या व भोळसर स्वभावाच्या होत्या. भारतीय संस्कृतीप्रमाणे 'पती हाच परमेश्वर' मानून आपल्या पतीची पूजा करीत होत्या.

**रा. ना. पवारांचे कुटुंब :**

रा.ना. पवार व आसावरींच्या लग्नाला दिवसामागून दिवस जात होते. घरात नवीन फुलं उमलणार याची चाहूल लागली पण नियतीला हे मान्य नव्हते. त्यांच्या घरात आनंदाचा क्षण दिसला की तो काळाला सहनच होत नसावा. एकानंतर एक अशी तीन मुले जन्मली आणि ती फुलण्याआधीच कोमेजून गेली.

आठ वर्षानंतर आसावरीने त्यांच्या कुलदैवताला नवस केला की, 'जन्मलेले मूल जगू दे, एकही कपडा विकत न घेता तुझ्या नावाने पाच वर्षाचा होईपर्यंत कपडे मागून घालीन.' रा.ना. पवारांचा अशा गोष्टीवर विश्वास नव्हता पण त्याच नवसाचे मूल सन १९५५ ला जन्मले व जिवंत राहिले. तोच आज फुलणारा व समाजातील विषमतेविषयी आग ओकणारा कवी माधव पवार होय.

कवी रा. ना. पवारांना दोन मुले आणि दोन मुली. माधव, रेखा, मुकुंद व वर्षा असा त्यांचा परिवार. रा.ना. पवारांची सुरुवातीला मुले वारल्यामुळे, असलेल्या मुलांना तळहातावरील फोडाप्रमाणे जपत होते. रा.ना. पवारांचे मित्र चंद्रभूषण कुलश्रेष्ठ यांनी म्हटले आहे, ''काव्य, संगीत, वाचन यांचा नाद त्यांनी आपल्या मुलांनाही लावला आहे. वडिलांविषयी रास्त अभिमान माधवच्या बोलण्यातून सहज डोकावत असतो. नकला करण्याची त्यांची कला माधवने अलगद उचलली आहे. दादाचे 'चिनी माऊचा बोका' हे चीन आक्रमणाच्या वेळचे गाणे लहानपणी माधवने जाहीर कार्यक्रमातून गाऊन प्रशंसा मिळविली आहे. रा. ना. पवार त्याला मित्रासारखे वागवतात तसेच त्यासारख्या अनेक कलाकारांना मित्रासारखे वागवून त्या ठिकाणी त्यांचाच मोठेपणा दिसून येतो.[१४] कवी रा.ना. पवारांचा मुलगा त्यांच्या काव्याचा आणि नकलांचा वारसा जोपासणारा माधव पवार म्हणतो, ''बाबांची इच्छा फार होती की आम्ही फार शिकावं, मोठं व्हावं, डॉक्टर, इंजिनियर बनावं, त्यातलं आम्ही कुणीच झालो नाही, त्याबद्दल आम्हाला वाईट वाटतं व त्यांनाही वाईट वाटत होतं पण नंतर मी त्यांच्याबरोबर असताना नकलांचे कार्यक्रम करु लागलो व कविताही करु लागलो व माझा लहान भाऊ मुकुंद बाबांच्या चित्रकलेचा वारसा चालवू लागला व आम्ही दोघेही प्रामाणिकपणे जगू लागलो याबद्दल त्यांना आनंद वाटत असे व ते कधी कधी म्हणतही असे की, 'शिक्षणाने तुम्ही मला समाधान दिले नाही; पण दोघेही प्रामाणिकपणे नोकरी व जीवन जगत आहात याबद्दल अभिमान वाटतो.''[१५]

रा. ना. पवारांनी त्यांच्या जीवनात प्रामाणिकपणाला सर्वश्रेष्ठ स्थान दिले. खऱ्या अर्थाने ते जगले. त्यांना ढोंगीपणाची अत्यंत चीड येई. त्यांनी मुलांनाही प्रामाणिकपणाचीच शिकवण दिली आणि मुलांनीही ती आजपर्यंत तंतोतंत पाळली. रा. ना. पवारांनी कौटुंबिक जीवनात सुखदु:खाचे जे अनुभव घेतले त्या अनुभवांचा आविष्कार करण्यापेक्षा त्यांनी इतरांच्या द्वारे आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत, याचा अर्थ त्यांनी आपल्या वैयक्तिक भावनांपेक्षा सामाजिक भावनांना अधिक महत्व दिले. त्यांच्या जीवनाविषयक, समाजविषयक कवितांमधून त्यांच्या कौटुंबिक जीवनाचे चित्रण स्पष्ट झाले आहे.

**मरणांशी झुंज :**

कवी रा. ना. पवारांचे जीवन इतके खाचखळग्यानी भरलेले होते की, त्यांचे अलौकिक कार्य व आकाशाला ठेंगणे करणारी भरारी जरी असली तरी त्यांच्या स्वाभिमानी व फटकळ स्वभावामुळे त्यांच्या पदरी उपेक्षाच पडली. रा. ना. पवारांना कोणतीही गोष्ट सहजासहजी मिळाली नाही. त्यांना आर्थिक परिस्थितीने तर कधीच साथ दिली नाही, त्याबरोबर शारिरीक प्रकृतीनेही साथ दिली नाही. या हाडाच्या कवीजवळ जबरदस्त इच्छाशक्ती होती. इच्छाशक्तीमुळेच हा कवी सतत आशावादी राहिला.

मरणालाही मारण्याची हिंमत त्यांच्या ठायी वसलेली होती. कोणतेही, कसलेही संकट आले तरी त्याला हसत खेळत सामोरे जाऊन त्याला आपलेसे करुन घेण्याचे अजब तंत्र त्यांच्याकडे होते. त्यांच्या शरीरावरती तरी इतके आघात झालेले आहेत की ते ऐकूनच अंगावर काटे उभे राहतात. तो भोगणारा माणूस कसा सहन करीत असेल?

रा. ना. पवारांच्या शरीराने वयाच्या ५०व्या वर्षापासूनच साथ दिली नाही, तरीही त्यानंतर बावीस वर्ष ते जगले. ते मरणाला मारुनच असे म्हणावे लागेल. म्हणून रा. ना. पवारांच्या ६० व्या वाढदिवशीच्या कार्यक्रमात डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात, ''रा.ना. पवारांच्या तोंडी हल्ली 'वय वर्ष साठ, शस्त्रक्रिया आठ' ही षडाक्षरी छंदातील दोन ओळीची कविता रा. ना. च्या ओठावर तरंगत आहे. हसत हसतच सांगतात, 'की डॉक्टरानी आपले पोट कुठून कुठपर्यन्त फाडले आहे याची सचित्र कथा ते आपल्या खास सोलापुरी शैलीत रंगवून सांगतात तेव्हा बाह्यतः हसत असताना कोणत्याही मनाचा क्षणभर तरी थरकाप होतो.''[१६]

रा. ना. पवारांच्या सप्टेंबर १९७५ ते एप्रिल १९७६ या सहा महिन्याच्या कालावधीत चार मोठ्या शस्त्रक्रिया झाल्या. त्यांच्या पोटावर १३० च्या अधिक टाक्या त्रिशुलाच्या आकारात ठसलेल्या दिसतात. श्री चंद्रभूषण कुलश्रेष्ठ म्हणतात, ''पोटाचे ऑपरेशन झाले १३० टाक्यांचा भला मोठा त्रिशुल लेख पोटावर वागवीत, किडनी निकामी झाली तरी हृदय शाबूत ठेवून रा. ना. आपल्या कवितेचा ताना मारतात.''[१७]

रा. ना. पवार शेवटी तीन महिने दवाखान्यातच होते. जामखेडचा 'संत नामदेव पुरस्कार' सन १९९२ चा त्यांना मिळाला; पण २८ ऑक्टोबरच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमाला हजर राहू शकले नाहीत, नंतर रामदास फुटाणे यांनी 'वाडिया हॉस्पिटल', सोलापूर मध्ये येऊन विजय तेंडूलकर यांच्या हस्ते सत्कार केला आणि दुसऱ्याच दिवशी 'जागतिक रंगभूमी दिनी म्हणजे ५ नोव्हेंबर १९९२ ला सकाळी ९ वाजून १० मिनीटांनी स्वर्गवासी झाले. प्रा. श्रीराम पुजारी शोकसभेत श्रध्दांजली अर्पण करताना म्हणाले , '' त्यांच्या निधनामुळे सोलापूरचे भूषण आपण हरवून बसलो आहोत. तीन महिने त्यांनी मृत्युशी झुंज दिली. मृत्यूला हसविणारे फार थोडे लोक असतात''[१८]

रा.ना.पवारांना मरणानंतर नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त केली होती, त्याप्रमाणे नेत्रपेढीला देण्यात आले.

कवी रा.ना.पवारांच्या पत्नी आसावरीनेही त्यांच्याबरोबर आहे त्या परिस्थीतीत जसे आहे तसे दिवस काढले. रा.ना.पवारांच्या कविता,नाटक यातील त्यांना काहीच माहिती नव्हती, तरी पण

रा.ना.पवार कविता केली की त्यांचा पहिला रसिक त्यांच्या पत्नीलाच करायचे. त्या आपले घर, आपली मुलं -बाळं, आपला प्रपंच यात रमून राहत होत्या. कवी रा. ना. पवारांच्या यशात निम्मे यश श्रीमती आसावरींचे आहे. त्या त्यांच्या पत्नी असून त्या आजकालच्या पत्नीसारख्या कधीही वागल्या नाहीत, उलट त्या निश्चलतेने त्या त्यांची साथ देत राहिल्या.

कवी रा. ना. पवार वारल्यानंतर त्या दु:खातून श्रीमती आसावरींनी आपल्या कुटुंबाला सावरून नेले. माधवच्या सुखी संसारात सहभागी होऊन राहिल्या; पण सुखाचा काळ हा काही दिवसासाठीच असतो. दि. ३ जानेवारी १९९८ या दिवशी त्यांनीही आपली जीवन यात्रा संपविली.

**गीतकार रा.ना. पवार :**

रा.ना. पवार कवी ,लेखक ,नट,नाटककार ,गायक यापेक्षा गीतकार म्हणूनच रसिकांच्या हृदयात ठाण मांडून राहिले,त्यांना अनेक मोठ्या गायक-गायिकांचा सहवास लाभला. थोरामोठ्यांच्या सहवासातून त्यांना जीवनातील अनेक चांगले वाईट प्रसंग अनुभवास मिळाले. अशा अनेक अनुभवांतून त्यांचे जीवन साकारत गेले आणि एक ठसठसीत रुप्याचे लेणे तयार झाले.

लता मंगेशकरांच्या जीवनातील पहिल्या रेकॉर्डिंगसाठी कोलंबिया कंपनीने रा. ना. पवारांची 'राया प्रेमगीत गाऊ' व 'मी रे किती साधी' ही दोन भावगीते निवडली होती. पण रा.ना. पवार व कोलंबिया कंपनीत मतभेद झाले व नशीबाची माशी शिंकली आणि तो मान 'राजा बढे' यांच्या 'नाच रे नंदकिशोरा' या गाण्याला मिळाला.[१९]

सौ. माणिक वर्मा यांचे पहिले गाणे रा. ना. पवारांच्या 'कशी जादुगिरी राया' अथवा 'नको झिडकारू प्रीत माझी' हेच ठरले असते पण तिथेही नको ते राजकारण आले आणि तो मान 'सुधीर फडके व ग. दि. माडगूळकर' यांच्या 'गोकुळीचा राजा' या चित्रपटातील 'सावळाचं रंग तुझा' या गीताला मिळाला.[२०] पण ही गेलेली संधी 'सुमन कल्याणपूर' यांनी गायिलेल्या 'सावळ्या विठ्ठला' या निमित्ताने पुन्हा मिळाली. रा.ना. पवारांचा 'सावळा विठ्ठल' म्हणजे सुमन कल्याणपुरांच्या जीवनातील पहिले रेकॉर्डिंग ठरले.[२१] आणि विशेष म्हणजे अमेरिकेतील मराठी विद्यार्थी/विद्यार्थीनींची भक्तिभावाने गाणारी प्रार्थनाच ठरली. [२२]

रा. ना. पवारांना लता मंगेशकरांच्या आवाजामुळे मोठे होता आले नाही; पण सुमन कल्याणपुरांच्या आवाजाने व भक्तिभावाने प्रेरित झालेल्या वारकऱ्यांच्या मनात आदराचे स्थान मिळविले, व यांचा 'सावळा विठ्ठल' अमेरिकेतही मराठी घराघरात पोहचला. रा.ना. पवारांच्या गाण्यामुळे माझा आवाजही अमेरिकेत पोहचला असे सुमन कल्याणपूर म्हणतात व पुढे त्या म्हणतात, ''सावळ्या

विठ्ठलामुळेच मी प्रकाशात आले.''[२३]

ज्योत्स्ना भोळे यांनी 'देवा बोला हो माझ्याशी' हे भक्तिगीत गायले. हे भक्तिगीत त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमांच्या सुरुवातीला म्हणायचे गीत झाले.[२४] त्यानंतर सौ. माणिक वर्मा यांनी 'नका विचारु देव कसा', 'क्षणभर उघड नयन देवा', 'प्रीत माझी', ' करिसी जादूगिरी राया', 'दृष्ट नको लावू', इ. भक्तिगीते व प्रेमगीते गाईली आहेत. हेमलता मांजरेकर यांनी 'आज नाहीच का बोलायचं?', 'मी आले आंघोळीला' इ. तसेच शांता शिराळ, जे.जी. गोरे व कृष्णा शिंदे यांनी 'दादाला माझ्या लगीन महागात पडलं' हे गीत व इतर अनेक गीते गाईली आहेत. रा.ना. पवारांनी सन १९६२ साली चीन-भारत युद्धाच्या प्रसंगी राष्ट्रभक्ती प्रज्वलित करण्यासाठी संग्रामगीते लिहिली; व दशरथ पुजारींनी युद्धाच्यावेळी राष्ट्रभक्ति प्रज्वलीत करण्यासाठी संग्रामगीतांचे अनेक मोफत कार्यक्रम केले, तसेच त्यांनी 'यशोदे थोर तुझे उपकार', 'प्रभू मी पूजन तव करणार!', 'चोरी करुन चोर पळाला' अशी अनेक गीते गाईली आहेत.

रा. ना. पवारांनी मनांचा छेद घेणारी, मनाला व्याकुळ करणारी आल्हाददायक अनेक गीते लिहिली आहेत. गाणाऱ्यांनी गात राहावे आणि ऐकणाऱ्यांनी ऐकत राहावे असा वाटणारा प्रसंग 'ज्योत्स्ना भोळे यांनी सांगितला आहे. आकाशवाणी पुणे केंद्रावर पुष्पा पावसकर यांनी 'ज्योत्स्ना भोळे' यांची मुलाखत घेतली त्यावेळी त्यांनी त्यांच्या जीवनातील अविस्मरणीय प्रसंग सांगितला तो असा ''हृदयविकाराच्या एका स्त्री रुग्णाला 'देवा बोला हो माझ्याशी...' हे गीत ऐकायची उत्कट इच्छा होती. त्यासाठी मला रुग्णालयात जावं लागलं आणि तिची इच्छा पूर्ण करावी लागली. अत्यंत भारावलेल्या त्या पेशंटने कृतज्ञतापूर्वक माझा हात हातात घेतला आणि म्हटले, 'अशाच काही क्षणासाठी, गाण्यासाठी मला जगावं असं वाटतं. ज्योत्स्नाबाई! खरं सांगू का, आता निम्मा आजार संपला मी आभार मानणार नाही. शब्दच अपुरे पडतात.''[२५]

**गायनकला :**

कवी रा.ना. पवार हे नुसते कवी नव्हते ते गायकही होते. गोड गळा आणि अभिनयाची उत्तम देणगी यांच्या जोरावर काव्यगायनाच्या मैफिलीत कमालीचा रंग भरीत होते. 'वहिनीनो माझ्या दादाचं दिवाळं काढलं', 'पाव्हणा मी खेड्यामधला', 'मारा दमदम् मारा झुरका, सिगारेट नाहीतर बिडी हुडका' अशी आकर्षक आणि उडत्या चालीची ठसकेबाज गीते अनेकवेळा 'वन्समोअर' मिळवतात.[२६]

कवी रा.ना. पवारांना लहानपणापासूनच गायनाची आवड होती. संपूर्ण 'तुकाराम गाथा'

लहानपणीच तोंडपाठ होती, तसेच 'संत तुकाराम' हा चित्रपट त्यांनी गाणे व हावभावासहित ग्रहण केला होता.[२७] त्याचा उपयोग त्यांना नकलांच्या कार्यक्रमात होत होता.

'मी आणि माझी कविता' या सोलापूर आकाशवाणी केंद्राच्या कार्यक्रमात कवी रा.ना. पवार म्हणतात, ''संगीत आधी की काव्य आधी हा वाद अद्यापही अनिर्णीत असला तरी मी मात्र संगीताच्या आकर्षणामुळे काव्याकडे ओढला गेलो. लहानपणापासून देवळातून होणाऱ्या भजनात टाळ वाजविणे व भजन गवळण म्हणणे हा आवडता छंद मला जडला होता.[२८]

कवी रा.ना. पवारांचे आवडते राग 'आसावरी', 'हमीर', 'बिलासखान तोडी', 'दरबार' इ. होय. त्यांना मुक्तछंदापेक्षा तालबद्ध लेखन, गायन आवडायचे. त्यांना शास्त्रीय पद्धतीचे गायन आवडत होते. त्यांच्या आजुबाजूला, घरातील व्यक्तिंची नावे हे आवडत्या रागाचीच ठेवली होती. त्यांनी त्यांचे लग्न झाल्यानंतर पत्नीच्या 'लीलावती' नावाचे 'आसावरी' असे नामकरण केले. स्वतःच्या पहिल्या मुलाचे नाव 'हमीर' असे ठेवले पण तो लहानपणीच देवाला प्यारा झाला. म्हणून त्यांच्या राहत्या घराजवळ 'हमीर' या नावाने वाचनालय चालवित होते. 'बिलासखानी तोडी' हे नाटक ही लिहिले आहे व ते प्रयोगरूपाने रंगमंचावर सादर झाले पण पुस्तकरुपाने प्रसिद्ध होऊ शकले नाही. आणि प्रसिद्ध करण्यासाठी त्यांनी कधी प्रयत्नही केला नाही. आजही ते नाटक हस्तलिखीत स्वरूपात उपलब्ध आहे.

इ. स. १९४८ ते १९५८ या काळात सोलापुरात दरवर्षी 'अमर महात्मा मेळा' भरीत होता. या मेळ्यात पदे व संवाद लिहिणे आणि गाणे म्हणणे इत्यादी कामे रा.ना. पवारच करीत होते. मुंबई, पुणे, औरंगाबाद, बडोदा, सांगली, सोलापूर इत्यादी आकाशवाणी केंद्रावर त्यांचे काव्य गायनाचे कार्यक्रम झाले आहेत; तसेच शाळा, कॉलेज, कविसंम्मेलन व इतर कार्यक्रमात त्यांना खास काव्यगायनासाठी आमंत्रण येत होते व ते आवडीने स्विकारत असत. त्यांच्या आवडत्या कविता 'लेकीची लावणी', 'कोंबडा', 'पाव्हणा मी खेड्यामधला', 'सावळ्या विठ्ठला', 'क्षणभर उघड नयन देवा' इत्यादी गीते गात होते व त्याच कविता ते कार्यक्रमातून गात होते.

रा. ना. पवारांची 'कोंबडा' ही कविता खास करुन कै. माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे सोलापूरला आगमन झाले की, आवर्जुन ही कविता ऐकल्याशिवाय जात नव्हते.[२९]

कवी रा. ना. पवारांना लता मंगेशकर, माणिक वर्मा, सुमन कल्याणपूर, ज्योत्स्ना भोळे, दशरथ पुजारी, कृष्णा शिंदे, हेमलता मांजरेकर, शांता शिराळ इ. गायकांचा थोडाफार सहवास लाभला आहे.

**नाटककार रा. ना. पवार :**

रा. ना. पवार हे कवी , गायक, नकलाकार, शाहीर, कथाकार, याप्रमाणे नट आणि नाटककार म्हणूनही गाजलेले होते. रा. ना. पवार अक्कलकोटला प्राथमिक शिक्षण घेत असतानाच अभिनयाचे व नाटक लिहिण्याचे धडे गिरवायला सुरुवात केली होती. वयाच्या दहाव्या वर्षी त्यांनी त्यांचे मेव्हणे इंगळे मास्तर लिखित 'खरा शिवाजी कोण?' ह्या नाटकात 'बहिर्जीची' भूमिका केली व त्याच वर्षी 'अफजलखानाचा वध' हे नाटक लिहून व दोन पेन्सिली तिकिट दर ठेवून नाट्यक्षेत्रात पदार्पणाचा शिक्का मोर्तब केला.[३०]

रा. ना. पवारांना लहानपणापासूनच नाट्यकलेचे वेड होते. सन १९३७ साली अक्कलकोटहून सोलापूरला आल्यानंतर त्यांच्या अनेक कलागुणांना भरपूर प्रमाणात वाव मिळाला. सोलापुरात अनेक नाट्यवेड्या कलावंतामध्ये रा. ना. पवार रमून गेले. त्यांनी हरिभाई देवकरण प्रशाला सोलापूर येथील शाळेत असताना 'नवयुग तरुण मंडळाची' स्थापना केली. या मंडळातर्फे दरवर्षी गणेशोत्सवात नाटके सादर केली. त्यांनी अनेक नाटके दिग्दर्शित केली आणि स्वत: ही अनेक नाटकांत विविध भूमिका करून प्रसंगानुसार अभिनय कौशल्याने रंगविल्या होत्या.

शाळा-कॉलेजमध्ये असताना रा. ना. पवार अनेक कार्यक्रमात भाग घेत असत. ते कॉलेजात असताना एक प्रभावी नट म्हणून सर्वांना परिचित होते. कॉलेजमधील आठवण सांगताना शब्दप्रभू व ख्यातनाम समीक्षक डॉ. निर्मलकुमार फडकुले लिहितात, ''रा. ना. पवारांना मी सन १९४४-४५ साली दयानंद कॉलेजच्या स्नेहसंम्मेलनात प्रथम पाहिले त्यावेळी 'लग्नाची बेडी' या आचार्य अत्र्यांच्या नाटकाचा प्रयोग दयानंद महाविद्यालयाचे विद्यार्थी सादर करणार होते. या नाटकातील 'गोकर्ण' नावाच्या पाच-सहा लग्ने करणाऱ्या एका इरसाल म्हाताऱ्याची विलक्षण विनोदी भूमिका रा. ना. पवारांनी कमालीच्या समरसतेने वठविली. त्यांच्या प्रत्येक हालचालीत आणि प्रत्येक शब्दात रंगेल म्हाताऱ्याचा अविष्कार साकार होत होता. निर्दोष, शुद्ध; स्पष्ट व ठसठसीत उच्चार आणि खणखणीत आवाज यातून जो 'गोकर्ण' प्रेक्षकांसमोर उभा राहिला. तो खरोखरच अभिनयातील एक चमत्कार होता. 'वंदे मातरम्' नाटकातही सोमेश्वराची भूमिका करुन रा.ना. पवारांनी प्रचंड धमाल उडवून दिली होती. गोकर्ण आणि सोमेश्वर या दोन भूमिका पुढे अनेक विनोदी नटांनी सादर केल्या पण पवारांनी जशा सफाईदार वठवल्या तशा मात्र मला नटवर्य धुमाळांच्या सुद्धा वाटल्या नाहीत हे प्रांजळपणे सांगितलेले बरे.''[३१]

रा. ना. पवारांनी प्र.के. अत्रे यांच्या नाटकाबरोबर मो.ग. रांगणेकरांच्या नाटकांतही भूमिका

वठविल्या आहेत. पु. ल. देशपांडे यांच्या 'अंमलदार' नाटकात, कवी संजीव यांच्या 'भूक' या नाट्यकाव्यात कुबेराची भूमिका, 'अंमलदारा'त 'ढेरेसाहेबा'ची भूमिका, 'वहिनी'मध्ये 'वल्लभ'ची भूमिका इत्यादी व इतर अनेक नाटकांत भूमिका वठविल्या आहेत. वरील नाटके मध्य रेल्वे गणेशोत्सव मंडळ, सोलापूर यांच्या तर्फेच बसविले होते.[३२] 'भूक' या नाट्य काव्याच्या कथेची कल्पना कवी संजीवांची तर त्यातील काव्यरचना रा.ना. पवारांची.'भूक' या नाट्यकाव्यात रा.ना. पवारांनी कुबेराची भूमिका केली आहे. त्यांना कुबेरासारखे जीवन तर जगता आले नाही; पण कुबेरासारखे जीवन जगण्याची अभिलाषाही त्यांच्या मनाला कधीच स्पर्श केली नाही. वेळेवर अर्धी भाकर मिळाली नाही आणि तोच कलाकार कुबेराच्या भूमिकेने रसिकांच्या मनाचा वेध घेऊन टाळ्यांचा कडकडाट मिळवितो. या शापित कलावंताला उद्देशून त्यांचा मुलगा माधव पवार 'शापित कलावंत' या कवितेत त्यांच्या जीवनाचा वास्तववादी वेध घेताना म्हणतो-

> ''हे शापित कलावंता
> रंगमंचावर कुबेराची भूमिका करताना
> घरात अर्ध्या भाकरीची तरी
> व्यवस्था करीत जा.''[३३]

कुणी गात राहतो, निर्मल आनंद मिळविण्यासाठी, कुणी गातो जीवन संगीन बनविण्यासाठी तर सिंधूताई सपकाळसारख्या पोटातली आग ओठात घेऊन गात राहतात पोटभरण्यासाठी, पण ह्या शापित कलावंताच्या पोटाला पोटभर तर सोडाच पण एकवेळही जेवायला मिळणे मुष्किल. ही त्यांच्या जीवनाची 'व्यथा' कधी 'गाथा' होतच नाही,व केलीही नाही. त्यासाठी पोटातला अग्नीचा भडका थंड करण्यासाठी, भाकरीचीच गरज असते. आलेले श्रोते पोटभर खाऊन अन्न पचविण्यासाठी व 'दाद' देण्यासाठी टाळ्या वाजवित बसलेले असतात.

> ''त्यांना अजिर्णामुळे
> तुला भूकेमुळे झोप नाही
> एकदंर दोघांनाही जागरण
> यातून कोणी कोणाला
> काय शिकवावे
> हाच माझ्या पुढचा
> यक्ष पश्न?'' [३४]

रा. ना. पवारांनी ना. धो. ताम्हनकर लिखित 'बच्चा नवरा' मध्ये 'तात्यासाहेब जहागीरदारा'ची भूमिका, वसंत दवडकरकृत 'कुटुंब' मध्ये 'बाबा'ची भूमिका वठविल्या आहेत.

रा. ना. पवारांनी दयानंद महाविद्यालय सोलापूर, नवयुग मंडळ सोलापूर, मध्य रेल्वे गणेशोत्सव मंडळ सोलापूर, अमर महात्मा मेळा सोलापूर, मराठी साहित्य संम्मेलन सोलापूर व तसेच मुंबई, पुणे, सांगली, बडोदा, औरंगाबाद, सोलापूर इ. ठिकाणच्या आकाशवाणी केंद्रांवर नाटके व नाटिका सादर केल्या आहेत.

रा. ना. पवारांच्या छत्राखाली कसलेले कलाकार जब्बार पटेल, प्रसिद्ध नट दिनानाथ टाकळकर, मा.ना.सुशीलकुमार शिंदे, नाना कामत, सारंग मामा कुलकर्णी, लक्ष्मण काटे इ. आहेत.

श्री. पु.ज. बुवा लिहितात, ''आजचे प्रसिद्ध नाट्यसिने दिग्दर्शक 'श्री जब्बार पटेल' रा. ना. पवारांच्या तालमीत कसलेले अस्सल सोलापुरी लेणे आहे. तसेच श्री. मा.ना. सुशिलकुमार शिंदे यांनाही नाटकात अभिनय करण्याचे मार्गदर्शन रा. ना. पवारांचे झाले आहे.[३५]

रा. ना. पवार खऱ्या अर्थाने परिचित झाले व प्रसिद्धीत आले ते 'कविराय रामजोशी' या नाटकाने. सन १९५१ साली त्यांनी हे नाटक लिहिल्यानंतर २०० पेक्षा जास्त प्रयोग महाराष्ट्रातील रंगमंच्यावर झाले आणि पुस्तकरूपाने सन १९६२ साली प्रसिद्ध झाले.

''कविराय रामजोशी' हे नाटक लिहिण्यास माझा मित्र नाना कामत यांनी प्रवृत्त केले.'' असे रा. ना. पवार म्हणतात. [३६]

नाना कामत आपल्या मित्रांच्या आठवणीच्या मैफलीत गुंग होऊन एक एक आठवण सांगताना म्हणतात, ''या माणसाला भोग तरी किती होता, जन्मापासून जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत सतत कशाच्या तरी व्यापाने त्यांचे जीवन ग्रासलेलेच होते. तरीही तो कधी मागे हटला नाही...''[३७] 'कविराय रामजोशी' हे नाटक रा. ना. पवारांनी लिहिल्यानंतर दिग्दर्शक गोविंद कुलकर्णी यांना पुण्याला हस्तलिखित प्रत द्यायला जाताना व दिल्यानंतर जे दोन प्रसंग नाना कामतनी सांगितले ते मनाला फार चटका लावून जातात. ते म्हणतात, ''कविराय रामजोशी हे नाटक लिहून झाल्यानंतर रा. ना. पवार व आमचे मित्र माधव पाटील दोघे रेल्वेने पुण्याला जात होते. त्यांच्याजवळ एक पिशवी त्यात कपडे व नाटकाची हस्तलिखित प्रत होती. ती बाकावर ठेवून त्याच ठिकाणी दोघेजण दोन्हीकडच्या बाकावर झोपले. दौंड स्टेशनजवळ आल्यानंतर त्यांना जाग आली आणि पाहतात तर पिशवी नाही. त्यांना काय करावे, काय नाही हेच कळेनासे झाले. स्टेशन आल्यानंतर त्यांनी ताबडतोब चौकी आणि

स्टेशन मास्तराशी संपर्क साधला, पण काही उपयोग झाला नाही. दुसऱ्या दिवशी 'रेल्वेचावीमन' रुळावरुन जात असताना त्यांना एक वही सापडली.चोरानी चोरी करुन काही न मिळाल्यामुळे चालत्या गाडीतूनच खाली टाकून दिली असावी आणि चावीमनने त्यावरती रा. ना. पवारांचे नाव वाचून अरे! ही तर आपल्या रेल्वेतल्या कविरायाची वही आहे असे म्हणून त्यांनी ती वही स्टेशन मास्तरला नेऊन दिली. स्टेशन मास्तारांनी ती प्रत रा. ना. पवारांना बोलावून दिली. त्यानंतर रा. ना. पवार ती प्रत घेऊन पुण्यातील दिग्दर्शक गोविंद कुलकर्णी यांना दिली. दुर्दैव एकदा पाठीशी लागले की ते माणसाला सोडता सोडत नाही; पण दुर्दैवापेक्षा सुदैव बलवंत्तर असले की दुर्दैवावर मात करुन सुदैव सदैव झळकतच असते. रा. ना. पवारांनी ती प्रत गोविंद कुलकर्णींना दिल्यानंतर पुण्याच्या मुळा-मुठा नद्यांना महापूर आला व त्यात घरे, गावे, शहरे उद्ध्वस्त झाली आणि त्यात गोविंद कुलकर्णींच्या घरातही पाणी शिरले; पण रा. ना. पवारांचे नशीब बंदपेटीत लपून बसले होते. गोविंद कुलकर्णींनी ती प्रत एका लोखंडी पेटीत ठेवली होती व त्या पेटीत पाणी न गेल्यामुळे ती प्रत बंद पेटीत पाण्यात राहूनही कोरडी राहिली होती.[३८] तुकारामाची गाथा पाण्यात राहूनही वर आली होती,पण रा. ना. पवारांची गाथा पाण्यात राहूनही जशीच्या तशीच राहिली होती.

'व्ही. शांताराम' यांच्या 'लोकशाहीर रामजोशी' ह्या सिनेमातील कलाकारांनीच रा. ना. पवारांच्या 'कविराय रामजोशी' ह्या नाटकातील भूमिका वठविल्या आहेत. रामजोशीची भूमिका 'जयराम शिलेदार', बयाच्या भूमिकेतून 'हंसा वाडकर' नंतर 'लीला गांधी' त्यानंतर 'मालती इनामदार', 'सौदामिनी शीला नाईक', संगीत दिग्दर्शका 'सौ.जयमाला शिलेदार' व विनोद्री मुर्ती वसंत शिंदे, तसेच आप्पासाहेब इनामदार, आप्पा ताम्हनकर, अनंत जोशी, सौ. आशा गाडगीळ इत्यादी कलाकारांनी या नाटकांतील भूमिका रंगविल्या आहेत.

रा. श्री. पंचवाघ म्हणतात, ''कविराय रामजोशी' या नाटकाचे लेखन मोठे चटकदार आहे. 'जयराम शिलेदार' यांच्या 'मराठी रंगभूमी' या नाट्यसंस्थेने या नाटकाचे 'दोनशे' देखणे प्रयोग करून मराठी रसिकांचे मनोरंजन केले आहे.''[३९]

कवी रा.ना. पवार सर्वांना रा. ना. म्हणूनच परिचित होते. पु. लं. देशपांडे त्यांना म्हणतात, ''रा. ना. आम्ही तुमचे 'कविराय रामजोशी' हे नाटक कुटुंबासह पाहिले व मंत्रमुग्ध झालो. 'मानापमाना' नंतर असा प्रसन्न शृंगार महाराष्ट्राला रामजोशीनेच दाखवला. प्रयोग भलताच रंगतो व रंगवितो.''[४०]

हारुन -अल्-रशीद म्हणतात, ''रा. ना. पवार हे एक कसलेले नट होते. त्यांच्या नाटकाची भाषा उठावदार व रंगतदार आहे. भाषाप्रभुत्व, काव्यप्रतिभा, अचूक इतिहास ज्ञान, प्रेक्षकात हास्यरसाचे खळाळ निर्माण करणारा विनोद व रंगभूमीचे समृद्ध जाण याचं एक समयोच्छेद करुन घडविणारं एक

रुपसंपन्न, लावण्यमय नाट्य मराठी रंगदरबारात आलं. मराठी लावणीचे रंग रा.ना. च्या लेखणीतून पुन्हा एकवार धन्य झाले आणि सोलापूरच्या लावणीची रुपखणी ही काय चीज आहे हे रा.ना. नी दाखवून दिले.''[४१]

विश्वनाथ फडके यांनी म्हटले आहे, ''कविराय रामजोशी' या नाटकातील चुरचुरीत संवाद, बोचरा, चावरा आणि फटकारणारा विनोद, शृंगारप्रधान काव्य आणि संयमित शृंगाराचे प्रवेश या गोष्टींचे कौशल्यपूर्वक वापर केलेले हे नाटक लिहिण्यापूर्वी तब्बल अडीच वर्ष रा. ना. पवारांनी साधनसामुग्री गोळा करण्यासाठी अक्षरशः जीवाचे रान केले आणि पुण्यासारख्या चोखंदळ प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.''[४२]

सन १९६२ ला भारत-चीन युद्ध चालू असताना राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी रा.ना. पवारांनी 'कविराय रामजोशी' या नाटकाचा नागपूरमधील 'धनवटे रंगमंदिरात' प्रयोग सादर केला. त्यावेळी त्या प्रयोगाचे ६३३/- रुपये राष्ट्रीय संरक्षण निधी म्हणून दिले.''[४३]

'कविराय रामजोशी' हे नाटक लिहिण्यापूर्वी रा.ना. पवारांनी 'दिशांदिशांतून उरले मी', 'दोन गडी बारा भानगडी', 'चोरांची चाळ', इ. नाटके लिहिली. सन १९६२ नंतर 'नवरे चालत येतात', 'आश्रित','सासू','आसावरीचे घर', 'बिलासखानी तोडी','सदाची शीव', 'मीलन', 'जिंकू किंवा मरु','वाहती गंगा' अशी तेरा नाटके लिहिली आहेत. ही सर्व नाटके आजही त्यांच्या घरी हस्तलिखित स्वरूपात धुळखात आहेत. यातील बरीच नाटके रंगभूमीवर सादर झालेली आहेत.

नाना कामत यांनी म्हटले, ''वरील नाटके रंगभूमीवर प्रयोगरुपाने सादर झालेली आहेत पण त्यांच्या स्वाभिमानी पण हट्टी व हेकेखोरीवृत्तीमुळे, 'मोडेन पण वाकणार नाही' अशा वृत्तिमुळे व कोणत्याही प्रकाशकासमोर हात पसरायचे नाही. कोणत्याही व कशाही प्रकारच्या केवळ व्यवहारुपयोगी गोष्टीशी तडजोड करायची नाही. अशा या वृत्तिमुळे त्यांची नाटके व कवितासंग्रह प्रसिद्ध झालेली नाहीत. हीच एक दुर्दैवाची बाब आहे.'' ते पुढे म्हणतात, ''रा.ना.नी स्वतःच्या हाताने स्वतःचे फार आर्थिक नुकसान करुन घेतले आहे. 'दिशां दिशांतून उरले मी' हे नाटक लिहिल्यानंतर सोलापुरातील भागवत चित्रमंदिराचे मालक शशीकांत भागवत यांनी हे नाटक दिग्दर्शित केले व त्या नाटकाचा सिनेमा काढायचे ठरविले व त्यांचे आगामी आकर्षण म्हणून मुंबईमध्ये फलक देखील लावले होते; पण यांच्या हेकेखोरी स्वभावामुळे मध्येच बंद पडले.''[४४]

त्यांचा मुलगा माधव पवार म्हणतो, ''माझे दादा दारिद्र्यातही कोणापुढे वाकले नाहीत आणि खरोखरच थोडेसे वाकले असते तर ते फार मोठे झाले असते. पण ते थोडेसे न वाकल्यामुळे आणखी

मोठे झाले.''[४५]

रा. ना. पवारांनी रंगभूमीची सेवा करण्यात सारे आयुष्य घातले आणि शेवटी रंगभूमीदिनी ५ नोव्हेंबर १९९२ रोजी काळाच्या पडद्याआड झाले.

**कथाकार रा. ना. पवार :**

रा. ना. पवारांनी सर्वसाधारणपणे सन १९४० पासून लेखनास प्रारंभ केला. रा. ना. पवारांच्या कविता, नाटकांबरोबर अनेक कथाही प्रसिद्ध झालेल्या आहेत. समाजस्थितीतील एखादा प्रसंग त्यांच्या मनाला भावला की त्याचे त्या प्रसंगातून एखादी कथा, कविता, नाटक इत्यादी वाङ्मयप्रकारांपैकी एकाचे रूप घेऊन तो प्रसंग हुबेहूब प्रकट करण्याची प्रतिभा त्यांच्याजवळ होती. समाजातील गरीब-श्रीमंत, लहान-थोर, स्त्री-पुरुष यांच्यामध्ये जी दरी निर्माण झालेली आहे ती कमी होण्याऐवजी वाढतच आहे. याविषयी त्यांना अत्यंत चीड येत असे. तसेच रंगभूमी व चित्रपटक्षेत्राशी त्यांचे नाते अतुट होते. चित्रपटसृष्टीतील अनेक चित्रविचित्र घडणाऱ्या घटना, त्यांचा समाजमनावर होणारा परिणाम यांचे सूक्ष्म अवलोकन करुन त्यांनी यथार्थपणे कविता व कथांमधून चित्रण केले.

रा. ना. पवारांच्या कथांची नावेच इतकी बोलकी आहेत की त्या कथांचे शीर्षकच बरेच काही सांगून जातात. त्यांच्या कथा दैनिक वर्तमानपत्र, मासिक व नियतकालिकेतूनही प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे -

१. समाजाचा बळी (**'दै. सकाळ'** मुंबई, दि. ५ डिसेंबर १९४३)

२. कल्पनेचा खून (रहस्यकथा) (**'रम्यकथा'**, मासिक जून १९५१)

३. जपानी मैना (**'वसंत'** मासिक, जुलै १९५०)

४. दिग्दर्शकाची सुंदर बायको (**'विविधवृत्त'**, ८ जुलै १९५१)

५. गैरशिस्त माणूस (**'वाङ्मयशोभा'**, मार्च १९५२)

६. रेल्वेच्या डब्यातला डाकू (**'माणिक'**, जुलै १९५२)

७. चांगुणा (का.ना.)

८. वेश्येशी विवाह (का.ना.)

९. मला श्रीमंत व्हायचं आहे, (का.ना.) इ. त्यांच्या कथा प्रसिद्ध आहेत.

रा. ना. पवारांनी इतर स्फुट लेखनही भरपूर केले आहेत. मानवी धर्माविषयी व परंपरेतील थोर पुरुषांच्या काही गुणवैशिष्ट्याने भारावलेल्या मनाने लिहिलेले त्यांचे काही लेखही प्रसिद्ध झालेत व ते पुढीलप्रमाणे -

१. गोरक्षण आणि स्वामी विवेकानंद (**'दै. लोकसत्ता'**, पुणे. का. ना.)

२. नमुनेदार वरपरीक्षा (विनोदी) (**'तारका'**, दिवाळी अंक १९४७)

३. वचनपूर्ती (विनोदी लेख) (**'स्वराज्य'**, २३ जुन १९५१)

४. सुभद्रा व चाणक्य (**'मोहिनी'** मासिक, का. ना.)

५. आगरकरांचा शिष्य (**'भगिनी'**, ऑगस्ट १९५२)

६. संपादक टिळक (**'दै. संचार'**, सोलापूर २ ऑगस्ट १९७२)

इत्यादी लेख त्यांचे प्रसिद्ध आहेत व हस्तलिखित स्वरुपात अनेक लेख व कथा लिहिलेल्या आहेत, आजही त्यांच्या घरी उपलब्ध आहेत.

**रेडिओ श्रुतिका :**

कवी रा. ना. पवारांचे जीवन अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाने बहरलेले होते. रा. ना. पवारांचे कार्यक्रम महाराष्ट्रातील जवळजवळ सर्वच आकाशवाणी केंद्रावरून झाले आहेत. भारत-चीन युद्धाच्या वेळेस तर मुंबई आकाशवाणी केंद्रावरुन दशरथ पुजारींनी गायिलेली संग्रामगीते दररोज युद्ध संपेपर्यंत सादर केली जात होती. मुंबई, पुणे, सागंली, बडौदा, औरंगाबाद आणि सोलापूर इत्यादी ठिकाणी त्यांचे काव्यगायनाचे कार्यक्रम आकाशवाणी केंद्रावर झालेले आहेत. सोलापूर आकाशवाणी केंद्राच्या उद्‌घाटन प्रसंगी रा. ना. पवारांच्या काव्यगायनानेच सुरुवात झाली.

रा. ना. पवारांची भक्तिगीते आणि संग्रामगीतांबरोबर आकाशवाणी केंद्रावर श्रुतिका व नाटिकाही सादर झालेल्या आहेत. त्यांच्या श्रुतिका व नाटिकांचे जवळजवळ ५० कार्यक्रम आकाशवाणी केंद्रावर सादर झालेले आहेत. 'भुजंग', 'इभ्रतीसाठी', 'तेराजून', 'असमर्थ', 'बायकोचा भाऊ','दौलताणी राणी', 'वीरश्रेष्ठ वनराज' इत्यादी सामाजिक श्रुतिका सादर झालेल्या आहेत व आजही हस्तलिखित स्वरूपात उपलब्ध आहेत. विश्वनाथ फडके यांनी म्हटले आहे, ''मुंबई, पुणे, बडोदा, हैद्राबाद,

औरंगाबाद या आकाशवाणी केंद्रावरून त्यांच्या अनेक श्रुतिका प्रेक्षेपित झाल्या. 'चांदीचं ताट' ही त्यांची श्रुतिका तर इतकी लोकप्रिय ठरली, की ती पाच वेळा प्रेक्षपित करावी लागली.''[४६]

रा. ना. पवारांची 'सावळ्या विठ्ठला', 'क्षणभर उघड नयन देवा', 'देवा बोला हो माझ्याशीSSS' ही भक्तिगीते, तसेच हिंदी चालीवर विडंबनात्मक काव्य आणि 'कोंबडा', 'लेकीची लावणी' ही गीते अनेकवेळा सादर झालेली आहेत.

**चित्रपट क्षेत्रातील कार्य :**

रा. ना. पवारांची आवडती कला अभिनय कला होय. त्यांना लहानपणापासून नकला करण्याची आवड होती. माणसांच्या अंत:करणाचा आलेख चेहऱ्यावरुन पारखून हावभावासहित अवलोकन करून त्यांची हुबेहुब नक्कल करायचे. यामुळे अभिनय करण्याचे कौशल्य त्यांच्या नसान्सात भिनलेले होते.

सन १९४३ साली रा. ना. पवार कोल्हापुरात भालजी पेंढारकरांकडे 'अप्रेंटिस ॲक्टर' म्हणून नोकरीला लागले होते हे आपण मागेच पाहिले. पुर्वी सिनेमात काम करणाऱ्या नटांना मासिक पगार देऊन कामावर ठेवले जात होते. त्याप्रमाणे रा. ना. पवारांना कामावर ठेवले होते; पण रा. ना. पवारांना काही वैयक्तिक अडचणीमुळे एक वर्षातच परत यावे लागले.

रा. ना. पवारांचे व्यक्तित्व विविध गुणांनी सजलेले होते. त्यांची सिनेमासृष्टीत जाण्याची तीव्र इच्छा होती. पण त्यांना वैयक्तिक अडचणीमुळे सोडून परत यावे लागले. रा. ना. पवारांची सिनेसृष्टीत जाण्याची इच्छा आहे ही बातमी पु. लं. देशपांडे यांना कळाली तेव्हा सिनेसृष्टीत बरा-वाईट अनुभव घेतलेले देशपांडे म्हणाले, ''हा जुगार करु नका.''[४७]

रा. ना. पवारांची सिनेमासृष्टीतील ही संधी हुकली. पण सन १९५७ मध्ये सुदैवाने त्यांना वैभवचित्रच्या 'भाऊबीज' या चित्रपटामध्ये 'मास्तराची' भूमिका करण्याची संधी मिळाली व त्यांची सिनेमासृष्टीतील जाण्याची इच्छा काही अंशी पूर्ण झाली.[४८]

रा. ना. पवारांना आदर्श शिक्षक होण्याची फार इच्छा होती. पण ती इच्छा पूर्ण झाली नाही. ती अतृप्त इच्छा सिनेमात शिक्षकाची भूमिका करून तृप्त केले.

**अमर महात्मा मेळा :**

सन १९४८ सालापासून सोलापुरातील होम मैदानावरती 'अमर महात्मा मेळा' भरीत

होता. हा मेळा सर्वसाधारणपणे सन १९४८ पासून १९५८ पर्यंत भरत होता. हा 'अमर महात्मा मेळा' दरवर्षी डिसेंबर महिन्यात दहा दिवस भरायचा. या मेळ्यामध्ये शेतकरी, कामकरी, सैनिक यांची गाणी, समरगीते असायची. पुढाऱ्यांच्या गमती-जमती असायच्या, कारभारणीचे प्रेम-विरह इत्यादी बरेच काही असायचे, स्वतंत्र कलाविष्काराचे ते एक सुंदर दालन होते.

चंद्रभूषण कुलश्रेष्ठ यांनी अमर महात्मा मेळ्याविषयी माहिती सांगताना म्हटले आहे, ''अमर महात्मा मेळ्याच्या काळात सोलापूर हे पूर्ण गिरणगाव होते,गिरणी कामगारांचे मनोरंजन करता-करता काही उद्‌बोधक, चमकदार विचार मेळ्याच्या गाण्यातून देण्यात कवी रा. ना. पवार आघाडीवर होते. एखाद्या गाजलेल्या फिल्मी गाण्याच्या चालीवर मेळ्याचे गाणे बेतावे लागे. त्यासाठी तत्कालीन सामाजिक परिस्थितीमधील विनोद शोधून प्रसंगाचे नाट्यपूर्ण चित्रण करायचे. हे विडंबनात्मक गाणे रा. ना. पवारांनी तयार केलेले लोकांच्या ओठावर रेंगाळत राही. रा. ना. पवारांनी अशी अनेक लज्जतदार गाणी लिहिली. त्यातील 'आरपार या चित्रपटातील 'ये लो मै हारी पिया' या गीताच्या चालीवर 'बाई मी भारी भोळी' हे गाणे गाजले. नवऱ्याच्या पगारीची उधळपट्टी करुन नवऱ्याला उपाशी ठेवून छानछौकीने राहणाऱ्या बाईचा उलटा कांगावा या गाण्यामध्ये रा. ना. पवारांनी मार्मिकपणे रंगविला आहे. तसेच 'बहार' या चित्रपटातील 'सैया दिलमे आनारे' या लोकप्रिय गीतांच्या चालीवर मुंबई पाहण्यासाठी गेलेल्या 'पाव्हणा मी खेड्यामधला' या गाण्यात हुबेहुब भांबावलेल्या पावण्याची चकित झालेली छबी हुबेहुब उभी करतात.''[४१]

सन १९५८ नंतर काळ बदलला, जमाना बदलला, मेळ्याचा जमाना जाऊन डान्सिंग पार्ट्या आल्या. डान्सिंग पार्ट्यांनी मेळ्यांना गिळून टाकले. डान्सिंग पार्ट्या आल्या आणि सिनेमाच्या गाण्यावर हिडीस स्वरुपाची कला सादर होऊ लागली. मेळ्याचा जमाना जाऊन ऑर्केस्ट्रॉ नामक प्रकार आला. पाश्चात्य वाद्ये आणि त्यांचा चित्रविचित्र मेळ घेऊन अमीर सयानीच्या नकला निवेदक व मेहमूद सारखी कॉमेडी करणारे विनोदी कलाकार आले आणि असेच सर्व बदलत गेले.

**राजकीय कार्य :**

स्वाभिमान, प्रामाणिकपणा व विशेष म्हणजे स्पष्टवक्तेपणा या गुणांशी मानवाचे नाते जुळणे जरा अवघडच असते. या गुणांच्या माणसाला परिस्थितीशी जुळवून घेणे माहितच नसते. उलट परिस्थितीलाच आपल्या हातात आणण्याचे कसब त्यांच्यात असते. कवी रा. ना. पवार ज्या ज्या क्षेत्रात वावरले ते क्षेत्र रानामय करुन टाकले. पण राजकारणात हे त्यांना जमले नाही. कदाचित तो त्यांचा पिंडच नसावा?

रा. ना. पवार कवी मनाचे, भावशील वृत्तिचे असल्यामुळे स्वातंत्र्य चळवळीतील पेटती परिस्थिती पाहून स्वत:ला त्यात झोकून दिले, पण स्वातंत्र्यानंतर त्यात रमले नाहीत.

सन १९४२ चा तो काळ. कवी रा.ना. पवार सोलापुरातील हरिभाई देवकरण प्रशालेत मॅट्रिकच्या वर्गात शिकत होते. ९ ऑगस्टचा स्वातंत्र्य लढा सुरु झाला. त्या दिवशी पहाटेच गांधी, नेहरु, पटेल आदि मान्यवर नेत्यांना ब्रिटीश सरकारने अटक केली. हे वृत्त सकाळीच सर्वांना समजले होते.

महात्मा गांधीजींच्या 'चलेजाव' या घोषणेने ब्रिटीशांविरुद्ध सारा भारत देश पेटून उठला. अनेक वीर आपल्या बायकां-मुलांना वाऱ्यावर सोडून स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती देण्यासाठी रस्त्यावर आले. अशावेळी चळवळ्या कवी मनाच्या, तारुण्यात फुलणाऱ्या कवी रा. ना. पवारांचे मन पेटून उठणे साहजिकच होते. त्यांच्या शेजारी राहणारा कॉंग्रेसचा कार्यकर्ता देशभक्त कै. गंगाराम संगमवार यांना भेटून आपल्या मनातील तळमळ व्यक्त केली, व त्यांनी शाळेतील मुलां-मुलींचा मोर्चा काढण्याचा सल्ला दिला.

कवी रा.ना. पवारांनी त्यांचे मित्र देशभक्त दायम्मा, प्रख्यात वकील केळकर यांचा मुलगा मोहन केळकर, डॉ. का.बा. चिंदरकर यांचा धाकटा भाऊ सदाशिव चिंदरकर यांना भेटून मोर्चाची योजना सांगितली व छन्नुसिंग चंदेलेकडून एक तिरंगी झेंडा घेऊन तिघेही शाळेच्या फाटकाजवळ साडेअकरा वाजता शाळा भरत असली तरी दहा वाजताच येऊन थांबले.

मोहन व सदाशिव यांचा शाळेत मुलां-मुलींवर दबदबा होता. त्यामुळे येणाऱ्या प्रत्येक मुलां-मुलींना रांगेत उभे करणे सोपे गेले.

कवी रा. ना. पवार पाच-सहाशे मुलां-मुलींचा मोर्चा व तिरंगी झेंडा हातात घेऊन अग्रभागी, मधोमध मोहन केळकर, पाठीमागे सदाशिव चिंदरकर अशा पद्धतीने ह. दे. प्रशालेच्या फाटकापासून 'महात्मा गांधी की जय', 'भारत माता की जय' या जयघोषाने मोर्चाची सुरुवात केली. 'नही रखना, नही रखना, ये काला कायदा नही रखना, ये जालीम सरकार नही रखना' अशा घोषणा देत ह. दे. प्रशाला, डफरीन चौक, पार्क मैदान असा मोर्चा जात होता. पार्क मैदानाजवळ मोर्चा आल्यावर रा.ना. पवारांच्या हातून चिंदरकरांनी झेंडा घेतला. पुढे हिराचंद नेमचंद वाचनालयाजवळ मोर्चा आला. तेवढ्यात त्यावेळीचे सार्जंट बेलीस, इन्स्पेक्टर जॉर्ज आणि दहा-बारा पोलिसांनी मोर्चावर लाठी हल्ला सुरु केला. सरकार विरुद्ध काढलेल्या मोर्चावर पोलीस लाठीहल्ला करतील यांची मुलां-मुलींनाच नव्हे तर त्या मोर्चातील तीन पुढाऱ्यांनाही कल्पना नव्हती. सुरुवातीला पोलिसांनी रस्त्यावर लाठ्या बडवून

नुसता आवाज काढला पण नंतर मात्र लाठ्यांनी मारण्यास सुरुवात केली. सर्वजण वाट फुटेल तिकडे सैरावैरा पळत सुटले. मोहन व सदाशिव रा. ना. पवारांच्या पुढे पळत जावून सरस्वती चौकात उभे राहिले. रा.ना. पवार मोर्चाचा नेता होता. पळून जाण्याचा विचारही त्यांच्या मनाला स्पर्श केला नाही. अंगात रग होती, बसेल तेवढा मार खाण्याची मनाची तयारी होती. बुडणाऱ्या नौकेच्या कप्तानाने नौकेबरोबर जलसमाधी घेतली पाहिजे असा सैनिक धर्म आहे, तो धर्म रा.ना. पवारांनी पाळला. रा. ना. पवारांच्या पाठीमागे पाच-सहा मुले चालत होती, पुढे सरस्वती चौकात आल्यावर रा. ना. पवारांच्या पाठीवरती बेलीससाहेबांचे दोन तडाखे बसले ना बसले, इतक्यात बेलीससाहेबांची नजर सदाशिव चिंदरकरांच्या हातातील झेंड्याकडे गेली. गांधी टोपी आणि तिरंगी झेंडा पाहिले की इंग्रज सरकारचे माथेच भडकायचे. तडक त्यांना सोडून बेलीससाहेब चिंदरकरांकडे वळले, त्याला फार झोडपले तरी तो झेंडा सोडला नाही शेवटी तो झेंडा पाच-सहा पोलिसांनी हिसकावून घेतला.

पांगलेल्या मुलां-मुलींना 'हायर प्रायमरी स्कुल' मध्ये जमवून रा.ना.पवारांनी ब्रिटीश सरकारचा निषेध व्यक्त केला. केळकर व चिंदरकर कुठे दिसत नव्हते. नंतर कसेबसे सर्वजण घरी गेले.

''९ ऑगस्ट १९४२ च्या चळवळीतील संपूर्ण भारतातील पहिला मोर्चा कवी रा.ना. पवारांनी काढला आहे,''[५०] असे ते वरील लेखात म्हणतात. पण इतिहासाने त्याची दखल घेतली नाही. स्थानिक पुढाऱ्यांनी त्यावेळची रा. ना. पवारांची चुणूक पाहून त्यांना जवळ केले. रा. ना. पवार यांनी म्हटले आहे, ''मी ही त्यानंतर धाडस म्हणून गुप्तपत्रके काढणे, वाटणे, भूमिगत कार्यकर्त्यांना बॉंबस् पुरविणे इत्यादी कामे केवळ 'थ्रिल' म्हणून केली. मी केलेल्या कामगिरीमुळे राजकीय वर्तुळात मला बरेच वरचे स्थान मिळाले होते. मी केलेल्या कार्याचे साक्षीदार म्हणून प्रसिद्ध देशभक्त कै. छन्नुसिंग चंदेले आणि विभूते यांनी स्वातंत्र्य सैनिकांना मिळणारी पेन्शन मला सनदशीर मार्गाने देण्याची तयारी केली. पण एक धाडस म्हणून केलेली देशभक्ती 'पेन्शन' मध्ये मला विकायची नव्हती. अठराविश्व दारिद्र्य पाचवीला पुजलेले होते तरी ' ही पेन्शन मला नको' असे दोघांनाही नम्रपणे सांगितले. त्यावेळी छन्नुसिंगाच्या शिव्याही मी खाल्या व ते रागाने मला म्हणाले, ''तू साले कहाँ तो खर्डेघाशीच करेगा!''[५१]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर रा. ना. पवार 'राजकीय संन्यास घेतला' असे जरी म्हणत असले तरी त्यांना राजकारणात शिरण्याची हौस असावी. ''कारण त्यांनी सोलापूर नगरपरिषदेची निवडणूक लढवली होती. सरकारी नोकर असतानाही विशेष परवानगी त्यांना देण्यात आली होती. लोकांनीही त्यांच्यासाठी उत्स्फुर्तपणे देणग्या गोळा केल्या; परंतु लोकांचे किंवा त्यांचे दुर्दैव व लालची पुढाऱ्यांचे सुदैव म्हणून ते काही निवडून आले नाहीत.''[५२]

राजकीय क्षेत्रात रा. ना. पवार काम करीत होते पण पुढाऱ्यांना आवश्यक असलेले 'गुण' आत्मसात करायची त्यांच्या मनाची तयारी होईना. व्यवहारात ज्याला 'बदमाशपणा' म्हणतात त्याला राजकारणात 'मुत्सद्दीपणा' म्हणतात या म्हणीची त्यांना पदोपदी प्रचीती येत होती. त्यांचे मन राजकारणात रमेना म्हणून ते त्यापासून दूर झाले. त्यांच्यातल्या कवीला आणि कलावंताला जोजीवले, जोपासले आणि साधेपणाने जीवन जगू लागले. पु. ल. देशपांडे म्हणतात, ''मंत्रीपद गेलेला मंत्री दात पडलेल्या सिंहासारखा दिसतो पण कवीचे पद कायम असते.'' एक कवी म्हणून रा.ना. पवारांना जगाने भरपूर प्रेम दिले आहे.

पारतंत्र्याच्या काळात कवी रा. ना. पवारांनी आपल्या कवितांनी सारा सोलापूर परिसर देश-प्रेमाने जागविला होता. याची साक्ष निदान सोलापूरच्या इतिहासातून तरी पुसून टाकणे अशक्य आहे. त्यांना मातृभूमीविषयी प्रेम होते. त्यांना जनसेवा, देशसेवा करण्याची इच्छा होती; पण राजकारण त्यांच्या भावनाविश्वाला मानवले नाही. त्यांच्या प्रतिभा विश्वाच्या मुलस्थानी असलेली मातृभूमिविषयक ज्वलंतभक्ती चिनी आक्रमणाच्या निमित्ताने पुनश्चः नव्या तेजाने प्रकट झाली.

स्वातंत्र्यानंतर एक तारी चिपळ्यांचा साजाने आणि भक्तिभावाने ओथंबलेले गाणे लिहित व गात होते पण 'चिनी माऊच्या बोक्या' ने ज्यावेळी 'हिंदी चिनी भाई भाई' म्हणून भारतावर आक्रमण केले त्या कसायाना धडा शिकविण्यासाठी युद्धावर जाणाऱ्या प्रत्येक जवानांना चिनी सैन्यांचे मस्तकच दिसले पाहिजे. त्यांच्या मनात स्फूर्ती निर्माण करण्यासाठी 'दै. संचार', सोलापूर या वर्तमानपत्रातून दि. १९ नोव्हेंबर १९६२ पासून सतत १३ ऑगस्ट १९६३ पर्यंत दररोज एक याप्रमाणे २५७ स्फूर्तीगीते 'भारत संरक्षण गाथा' या सदरात लिहिली आहेत. यातील काही निवडक स्फूर्तीगीते घेऊन १ डिसेंबर १९६२ला 'संग्रामगीते' हा संग्रह 'जयहिंद प्रकाशन, मुंबई' या संस्थेने प्रकाशित केला. पहिली आवृत्ती एक महिन्यात संपल्यानंतर जानेवारी १९६३ ला दुसरी आवृत्ती काढली. त्यांनी त्यातील एक पैसाही न घेता आलेला पैसा 'राष्ट्रीय संरक्षण निधी' साठी दिला. कवी रा. ना. पवार प्रामाणिकपणाला सोडून कधी वागले नाहीत. राजकारणात जो माणूस स्वाभिमान विकून प्रामाणिकपणाशी फारकत घेऊन बेईमानदारीशी नाते जोडतो तोच माणूस आजकालच्या राजकारणात रमू शकतो; व त्यांनाच सामाजिक प्रतिष्ठेचा मान मिळतो पण रा. ना. पवारांना हे कधी जमलेच नाही. गुणवान असूनही धनवान काही झाले नाहीत. धनवान झाले नाहीत म्हणून गुणवानपणा काही सोडला नाहीत.

या घटनांतून असे दिसून येते की त्यांचा पिंड राजकारणी माणसाचा नव्हता, परंतु वृत्ती मात्र राष्ट्रभक्तीची होती म्हणून स्वातंत्र्य आंदोलनात त्यांनी भाग घेतला आणि नंतर राष्ट्रीय स्वरुपाची कविता लिहिली.

प्रकरण पहिले

## संदर्भ

| | | | |
|---|---|---|---|
| १) | रा. ना पवार | :- | *''सोलापूर जिल्ह्याची शाहिरी परंपरा''* आकाशवाणी केंद्र, सोलापूर. |
| २) | रा. ना. पवार | :- | *'बालमित्र सार्जट सिद्धू'*, दै. तरुण भारत, सोलापूर दि. ८ मे १९९१ |
| ३) | लक्ष्मण काटे | :- | *'अभिजात स्फुर्तीचे वरदान मिळालेले रा. ना. पवार'* दै. विश्वसमाचार, सोलापूर दि. २९ जुलै १९७२. |
| ४) | लक्ष्मण काटे | :- | तत्रैव, |
| ५) | चंद्रभूषण कुलश्रेष्ठ | :- | *'बहुढंगी व्यक्तिमत्व रा. ना. पवार'*, दै. संचार, सोलापूर. दि. ३ ऑगस्ट १९८६ |
| ६) | पु. ज. बुवा | :- | *'काव्य स्मृतीचा सुगंध लुटणारे मराठी मन महाराष्ट्राचे थोर नामवंत कवी रा. ना. पवार'* दै. संचार, सोलापूर. दि. २२ ऑगस्ट १९८०. |
| ७) | रा. ना. पवार | :- | सुरेश करंदीकर यांनी घेतलेली मुलाखत. (का.ना.) |
| ८) | रा. ना. पवार | :- | *'फ्रेन केलेला चेक'* दै. तरुण भारत, सोलापूर. दि. ६ मार्च १९९१. |
| ९) | रा. ना. पवार | :- | तत्रैव. |
| १०) | रा. ना. पवार | :- | तत्रैव. |
| ११) | ना. रा. कुलकर्णी | :- | *'वेदनेचे दान मागणारा एक 'आनंददायी कवी'* दै. विश्वसमाचार, सोलापूर दि. २९ जुलै १९७९. |
| १२) | रा. ना. पवार | :- | उनि. |

१३) प्रकाश मिसाळ :- *'रा. ना. पवार :एक कवी, एक माणूस'*
विशाल सह्याद्री, सोलापूर दि. ५ ऑगस्ट १९७९.

१४) चंद्रभूषण कुलश्रेष्ठ :- उनि.

१५) माधव पवार :- *'आमचे दादा'* दै. केसरी, सोलापूर. दि. ५ नोव्हेंबर १९९३.

१६) निर्मलकुमार फडकुले :- *'कवी रा. ना. रसिक दिलखुलास माणूस'*
दै. संचार, सोलापूर. दि. २९ जुलै १९८१.

१७) चंद्रभूषण कुलश्रेष्ठ :- उनि.

१८) वृत्त :- *'जुन्या पिढीतील कवि रा. ना. पवारांचे निधन'*
दै. केसरी, सोलापूर दि. ६ नोव्हेंबर १९९२.

१९) शरदकुमार एकबोटे :- *कविराय बोला हो माझ्याशी SS!*
दै. तरुण भारत, सोलापूर दि. ३ ऑगस्ट १९८६.

२०) शरदकुमार एकबोटे :- तत्रैव.

२१) शरदकुमार एकबोटे :- तत्रैव.

२२) विजया जोशी :- **'अमेरिकेतील आठवणी'** 'स्त्री' मासिक जुलै १९७९.

२३) सुमन कल्याणपूर :- *'यांची मुलाखत'* दै. विश्वसमाचार, सोलापूर. (का.ना)

२४) शरदकुमार एकबोटे :- उनि.

२५) शरदकुमार एकबोटे :- उनि.

२६) विश्वनाथ फडके :- *'अनुभवांनी समृद्ध असलेले कलाजीवन'*
दै. केसरी, सोलापूर दि. १५ सप्टेंबर १९६८.

२७) दिवाकर दुनाखे :- *'कविवर्य रा. ना. पवार एक जीवनाभिमुख व्यक्तिमत्व'*
दै. संचार, सोलापूर २१ जुलै १९७५.

२८) रा. ना. पवार :- *'मी आणि माझी कविता'* आकाशवाणी केंद्र, सोलापूर.

२९) रा. ना. पवार :- *'कै. यशवंतराव चव्हाण यांना कवी रा. ना. पवारांची शब्द सुमनांजली'*
दै. संचार, सोलापूर. दि. २६ नोव्हेंबर १९८५.

३०) पु. ज. बुवा :- उनि.

३१) निर्मलकुमार फडकुले :- *'कवि. रा. ना. पवार:रसिक दिलखुलास माणूस'*
दै. संचार, सोलापूर दि. २१ जुलै १९८१.

३२) अल्बममधून

३३) माधव पवार :- *'शापित कलावंत'* दै. केसरी, सोलापूर. दि. १८ ऑगस्ट १९९६.

३४) माधव पवार :- तत्रैव.

३५) पु. ज. बुवा :- *'काव्य स्मृतीचा सुगंध लुटणारे मराठी मन महाराष्ट्राचे थोर नामवंत कवी रा. ना. पवार'* दै. सचांर, सोलापूर दि. २२ ऑगस्ट १९८०.

३६) रा. ना. पवार :- *'कविराय रामजोशी'* या नाटकाची प्रस्तावना पृ. ५.

३७) नाना कामत :- *'नाना कामत यांच्याशी संवाद'* दि. ११ फेब्रुवारी १९९८.

३८) नाना कामत :- तत्रैव.

३९) रा. श्री. पंचवाघ :- *'रा. ना. सोलापुरी कवितेचा मानकरी'*
दै. तरुण भारत, सोलापूर दि. २१ जुलै १९९२

४०) शरदकुमार एकबोटे :- उनि.

४१) हारुन-अल्-रशीद :- *'रा. ना. पवार यांचे अभंग-शतक'*
दै. संचार, सोलापूर दि. ३ मार्च १९६३.

| | | | |
|---|---|---|---|
| ४२) | विश्वनाथ फडके | :- | उनि. |
| ४३) | वृत्त | :- | *'कविराय रामजोशी एक रंगतदार नाट्यप्रयोग'* दै. तरुण भारत, नागपूर दि. १७ नोव्हेंबर १९६२. |
| ४४) | नाना कामत | :- | उनि. |
| ४५) | माधव पवार | :- | *'आमचे दादा'* दै. केसरी सोलापूर. दि. ५ नोव्हेंबर १९९३. |
| ४६) | विश्वनाथ फडके | :- | उनि. |
| ४७) | पु. ज. बुवा | :- | *'काव्य स्मृतीचा सुगंध लुटणारे मराठी मन महाराष्ट्राचे थोर नामवंत कवी रा. ना. पवार'* दै. संचार, सोलापूर दि. २२ ऑगस्ट १९८०. |
| ४८) | प्रकाश मिसाळ | :- | *'रा. ना. पवारः एक कवि, एक माणूस'* विशाल सह्याद्री, सोलापूर दि. ५ ऑगस्ट १९७९. |
| ४९) | चंद्रभूषण कुलश्रेष्ठ | :- | *बहुढंगी व्यक्तिमत्त्व रा. ना. पवार* दै. संचार, सोलापूर दि. ३ ऑगस्ट १९८६. |
| ५०) | रा. ना. पवार | :- | *'९ ऑगस्ट १९४२ चा सोलापूरातील मोर्चा आणि मी'* दै. संचार, सोलापूर दि. ९ ऑगस्ट १९९१. |
| ५१) | रा. ना. पवार | :- | तत्रैव. |
| ५२) | विश्वनाथ फडके | :- | उनि. |